महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, कराड यांचे प्रशासकीय अधिकार सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कराड यांना प्रदान करणेबाबत.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
# राहुरी, जि.अहिल्यानगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-३ (७४६)/ ८३ /२०२५ दिनांक-०३ /०३ /२०२५

वाचा - १. विद्यापीठ आदेश जा.क्र प्रशा/अ-२/ कृसंकेकराड/प्र.अ./स.अ./२२९४/२०२४, दिनांक- ०५/०७/२०२४
२. कार्यकारी परिषदेच्या ३४१ व्या बैठकीतील ठराव क्र.९९/का.प.बै.३४१ (२२/०७/२०२४)

**पार्श्वभुमी -**

शासन निर्णय क्रमांक मकृवि- २०११/प्र.क्र.८०/७- अे, दिनांक १६/०७/२०१३ नुसार कृषी महाविद्यालय, कराड याची स्थापन झालेली असून या महाविद्यालयाकरीता शिक्षकवर्गीय पदे- २९ व शिक्षकेत्तर ३६ अशी एकुण ६५ पदे मंजूर झालेली आहेत. सद्यस्थितीस कायम आस्थापनेवरील एकूण ६५ मंजूर पदांपैकी शिक्षकवर्गीय - १४ पदे व शिक्षकेत्तर- १३ पदे अशी एकूण २७ पदे भरलेली असून ३८ इतकी पदे सद्यस्थितीस रिक्त आहेत. मंजूर आकृतीबंधाचे अवलोकनानुसार या पदांच्या वर्गवारीमध्ये प्रक्षेत्रावरील शेतीविषयक व भांडार विषयक कामांचा थेट संबंध, आवश्यकता असलेली पदे उदा. वरिष्ठ संशोधन सहाय्यक, कनिष्ठ संशोधन सहाय्यक, कृषी सहाय्यक, गणक, मजुर इ. पदे मंजूर नाहीत. त्यामुळे या महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या प्रक्षेत्रावरील शेतीविषयक कामे करतांना, विद्यापीठाकडून बिजोत्पादनाचे कार्यक्रम राबविताना, महाविद्यालयातील विद्यार्थ्याचे अनुभव आधारित प्रशिक्षण कार्यक्रम (ELP) राबवितांना संबंधीत विभागातील सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक इ. शिक्षकांवर अध्यापनाव्यतिरिक्त अधिकचा कामाचा ताण पडत आहे.

दरम्यान, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०२०/ प्र.क्र.११/१३- अे, दिनांक १५.०३.२०२४ नुसार तालुका बीज गुणन केंद्र, सैदापूर, ता. कराड, जि.सातारा येथील कृषि विभागाचे अखत्यारीतील एकूण १३.०३ हेक्टर क्षेत्रापैकी १०.०० हेक्टर क्षेत्र जमीन या महाविद्यालयासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचेकडे हस्तांतरीत करणेत आलेली आहे. प्रक्षेत्रावरील आगामी हंगामातील पिक उत्पादनाचे नियोजन व क्षेत्र विकासाच्या दृष्टिने उपलब्ध होणारे क्षेत्रावरील शेतीविषयक कामे करणेकरीता कृषि संशोधन केंद्र, कराड येथील कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवा उपयोगात आणून सैदापूर प्रक्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रम राबवून विद्यापीठ महसूली उत्पन्नात भरीव वाढ करणे महाविद्यालयास शक्य होईल. प्रस्तावित मौजे टेंभू, ता. कराड येथील २४.५९ हेक्टर इतके क्षेत्र जमीन हस्तांतरण प्रक्रिया मंत्रालय पातळीवर प्रगतीपथावर असून भविष्यात या दोनही प्रक्षेत्रावरील पिक नियोजनाकरीता उपलब्ध मनुष्यबळाचा पुरेपुर वापर करण्याच्या दृष्टिने कृषी संशोधन केंद्र, कराड येथील अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवा विनासायस वापर करण्याच्या दृष्टिने त्यांचे प्रशासकीय नियंत्रण सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, कराड यांचे अधिनस्त दिल्यास सदरील

कामकाज अधिक जलद गतीने व कालमर्यादेत पार पाडणे शक्य होईल. त्यामुळे विद्यापीठाचे महसूली उत्पन्नात भरीव वाढ होईल.

मा. कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने विद्यापीठ आदेश जा.क्र. प्रशासन / अ- ब/ सेवा/कृमवि-कराड/४०८/२०२३, दिनांक ०९/०२/२०२३ नुसार कृषी संशोधन केंद्र, कराड यांच्या अधिनस्त कार्यरत असलेले गट अ ते गट-ड संवर्गातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा दोनही कार्यालय प्रमुखांच्या सामंजस्याने महाविद्यालयातील अध्यापनाची कामे, कार्यालयीन कामे, प्रक्षेत्रावरील कामे पार पाडणेविषयीचे आदेश पारित करण्यात आले आहे. त्यानुसार महाविद्यालयातील अध्यापन, प्रक्षेत्र, कार्यालयीन विविध आवश्यक जबाबदाऱ्या पुर्ण करणेकामी संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचे कामाच्या जबाबदारी विषयक कार्यालयीन आदेश काढणेत येवून कामकाज पुर्ण करणेत येत आहे.

कृषी महाविद्यालय, कराड व कृषी संशोधन केंद्र, कराड ही दोनही कार्यालये एकाच परिसरात कार्यरत असल्याने अंतर्गत रस्ते वापराकरीता होणारे रस्ते निर्मितीचा फायदा, संपुर्ण प्रक्षेत्र संरक्षक भिंतीने सुरक्षित, सामायिक सुरक्षा कर्मचारी व्यवस्था, अंतर्गत शोभिवंत झाडांची प्रस्तावित लागवड, सामायिक पिण्याचे व सिंचनाचे पाणी व निचरा व्यवस्था, सामायिक प्रक्षेत्रामुळे प्रशिक्षणार्थी शेतकरी- विद्यार्थी यांना एकाच ठिकाणी तंत्रज्ञान व मार्गदर्शन उपलब्ध होण्याची सुविधा निर्मिती, सामायिक प्रक्षेत्रामुळे पिक लागवड करतांना सामायिक यंत्र- सामुग्रीचा वापर, मजूर खर्चात बचत, जलद गतीने कामांचा निपटारा असा विविध बार्बीवर कृषी संशोधन केंद्र, कराड व कृषी महाविद्यालय, कराड या दोनही कार्यालयांना लाभकारक होवून विद्यापीठाच्या कामकाजात निश्चित उपयोग होईल व विद्यापीठाचे महसूल उत्पन्नात वाढ होईल.

त्याअनुषंगाने, मा. कार्यकारी परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून दिनांक २२/०५/२०२४ रोजीच्या विद्यापीठ बिजोत्पादन कार्यक्रम आढावा बैठकीचे परिमंडलित इतिवृत्त No.C.S.(Seed) Planning - minutes/1999/2024,Dated 14.06.2024 मधील निर्णय "कृषी संशोधन केंद्र, कराड येथील उपलब्ध मनुष्यबळ व संसाधनाचा कार्यक्षम वापर करण्यासाठी प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, कराड येथील उपलब्ध मनुष्यबळ व संसाधनाचा कार्यक्षम वापर करण्यासाठी प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, कराड हे सहयोगी संशोधन, राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प,शेंडापार्क, कोल्हापुर ऐवजी सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय कराड यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतील" नुसार विद्यापीठ आदेश जा.क्र. प्रशा/ अ-२/ कृसंके कराड/ प्र.अ./स.अ./ २२९४/२०२४, दिनांक ०५/०७/२०२४ निर्गमीत करण्यात आलेला आहे.

**विद्यापीठ निर्णय-**

कृषी संशोधन केंद्र, कराड या केंद्राचे विद्यापीठ ठराव क्रमांक एमटीजी-२ (८८)/३५४/२०१५, दिनांक ३१/०३/२०१५ नुसार प्रशासकीय अधिकाराखाली समाविष्ट होणाऱ्या बाबी व त्यानुषंगाने म.ना.से. नियमांतर्गत सेवा विषयक, आस्थापनाविषयक प्रकरणे मंजुरी / शिफारस करणेचे अधिकार, तदअनुशांगिक वित्तीय लाभाची प्रकरणे मंजुरी/ शिफारस करणेचे सर्व प्रशासकीय अधिकार सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, कराड यांना प्रदान करण्यात येत आहेत. कार्यकारी परिषदेच्या दि. २२/०७/२०२४ रोजी झालेल्या ३४१ व्या बैठकीमधील विषय क्र. ९५ (९) आणि ठराव क्र. ९९ चे ठरावान्वये मा. कुलगुरु वरील बदलास मान्यता प्रदान करीत आहे. तसेच, प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र यांचे सद्यस्थितीतील आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कर्तव्य जबाबदारी त्यांचेकडेस कायम ठेवून, विद्यापीठ पातळीवरुन निश्चीत केले जाणारे संशोधन विषयक अनिवार्य कामे, विद्यापीठ स्तरावरुन

निर्देशीत होणारे बिजोत्पादन/ पिक नियोजन कार्यक्रम, त्यानुषंगाने आवश्यक सेवा- खर्चाच्या आर्थिक बाबी मंजुरी/ शिफारस करणेचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय कराड यांना प्रदान करणेत येत आहे.

कृषि संशोधन केंद्र, कराड यांचे संशोधन विषयक तांत्रिक नियंत्रण सहयोगी संशोधन संचालक, रा.कृ.सं.प्र., कोल्हापूर यांचे मार्फत पूर्वीप्रमाणे कायम ठेऊन सर्वस्वी नियंत्रण मा. संशोधन संचालक, मफुकृवि, राहुरी यांचे राहील.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
मफुकृवि, राहुरी

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव -

१. उपसचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०३२
२. मा.सहसंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४
३. मा. संचालक, संशोधन/ विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
४. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
५. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
६. विभाग प्रमुख (सर्व)
७. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
८. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व)
९. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व).
१०. नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ नियोजन अधिकरी, मफुकृवि, राहुरी.
११. उपकुलसचिव (प्रशासन)/ (विद्या), मफुकृवि, राहुरी
१२. अधिदान व लेखाधिकारी/ सहाय्यक नियंत्रक/सहाय्यक कुलसचिव (सर्व)
१३. मा.कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी

उपकुलसचिव (प्रशासन)
मफुकृवि, राहुरी